# ताप

## अनुक्रमणिका

**१. ताप** **१४**

शरीराचा ताप १४

इंद्रियांचा ताप १४

मनःस्ताप १४

स्वस्थ माणसाचे तापमान १४

तापाची कारणे १५

तापातील इतर लक्षणे १७

प्राणी वनस्पती व पंचमहाभूतांतील ताप १९

तापाची मूळ उत्पत्ति १९

आयुर्वेदाप्रमाणे तापाची कारणे २०

तापाचे प्रकार २१

संप्राप्ति २२

आमाच्या स्थितीनुसार तापाच्या चार अवस्था २३

दोषवृद्धीमुळे होणाऱ्या तापाच्या आठ अवस्था २४

तापाची पूर्व रूपे २७

नवजात मुलातील तापाची वैशिष्ट्ये २७

चिकित्सा सूत्रे २८

लंघन २८

किती दिवस लंघन करावे २८

अति लंघनाचे दुष्परिणाम २८

लंघनास अयोग्य व्यक्ति २९

पाणी २९

पेज (पेये) ३०

डाळीची कढणे ३०

| | |
|---|---|
| मटण सूप | ३० |
| फळांचे रस | ३१ |
| तापाच्या पहिल्या अवस्थेत पथ्य व अपथ्य | ३३ |
| तापाच्या दुसऱ्या अवस्थेत पथ्य व अपथ्य | ३४ |
| औषधांचे काढे | ३६ |
| औषधी सिद्ध दूध व तूप | ३६ |
| संशोधन | ३७ |
| बस्ति | ३७ |
| **२. दोषज ताप** | **३९** |
| वातज ताप | ३९ |
| वातज ज्वर (ताप) औषधे | ३९ |
| वातज तापात औषधे | ४० |
| पित्तज्वर कारणे | ४१ |
| पित्तज्वर लक्षणे | ४१ |
| पित्तप्रधान ताप | ४१ |
| कफज्वर कारणे | ४२ |
| कफज ताप लक्षणे | ४२ |
| कफप्रधान तापावर औषधे | ४३ |
| वात पित्त ज्वर | ४३ |
| पित्त कफज ज्वर | ४३ |
| कफ वातज ताप | ४४ |
| त्रिदोषज सान्निपतिक ताप | ४४ |
| त्रिदोषज तापावर औषधे | ४५ |
| सान्निपतिक तापात चिकित्सा सूत्रे | ४६ |
| तापातील वाढलेल्या दोषाचे निदान | ४७ |
| **३. धातुगत ताप** | **४८** |
| रसगत ताप | ४८ |
| रक्तगत ताप | ४९ |
| मांसगत ताप | ४९ |

मेद धातूगत ताप ४९
अस्थिगत ताप ५०
मज्जागत ताप ५१
शुक्रगत ताप ५१
**४. विषमज्वर** **५२**
विषमज्वरातील तापाची वैशिष्ट्ये ५२
विषमज्वरातील उपचाराची तत्त्वे ५३
विषमज्वरावर औषधे व आहार ५४
**५. जीर्णज्वर** **५६**
जीर्णज्वर व विषमज्वर ५६
जीर्णज्वरात सामान्य उपचार ५७
जीर्णज्वरात रसायन प्रयोग ५८
**६. आगन्तुज्वर** **५९**
आगंतुज्वर प्रकार ५९
कामज्वर ६०
भयजन्य ज्वर ६१
शोकज्वर ६१
क्रोधज ज्वर ६१
भूतज्वर ६१
विषजन्य ज्वर ६२
अभिशापज व अभिचारज ताप ६२
**७. तापातील लक्षणे, उपद्रव व त्याचे उपचार** **६३**
तापातील लक्षणांची व उपद्रवांची चिकित्सा ६३
तहान लागणे ६३
घाम जास्त येत असल्यास ६३
तापामध्ये थंडी वाजत असल्यास ६३
दाहशामक काढा ६४
हातपाय थंड असणे ६४
तीव्र ताप ६४

| | |
|---|---|
| सुस्ती येणे | ६५ |
| तोंड येणे | ६५ |
| तोंडास चव नसणे | ६५ |
| उलटी | ६६ |
| जुलाब होणे | ६६ |
| मलावरोध | ६६ |
| गुदद्वाराच्या जागी चिरा होऊन आग होणे | ६६ |
| पोटात दुखणे | ६६ |
| घसा आवळल्यासारखा होणे | ६७ |
| घशात खवखवणे | ६७ |
| उचकी | ६७ |
| खोकला दमा | ६७ |
| थुंकीत रक्त येणे | ६७ |
| पार्श्वशूल | ६८ |
| डोके दुखणे, कंबर दुखणे | ६८ |
| झोप न येणे | ६८ |
| ग्लानि | ६८ |
| भ्रम | ६८ |
| तापात रक्तस्त्राव होत असल्यास | ६८ |
| कर्णक | ६८ |
| रूग्दाह | ६९ |
| ज्वरानंतर अशक्तपणा | ६९ |
| ताप उलटल्यास | ६९ |
| मूर्च्छा | ७० |
| तिरळेपणा | ७० |
| इंद्रियनाश | ७० |
| सर्व दोषांची वृद्धि | ७० |
| हृदयाची कमजोरी | ७० |
| **८. साध्यासाध्यत्व** | **७१** |

धातुपाक लक्षणे ७१
धातुदृष्टि व साध्यासाध्यत्व ७१
दोषपाक लक्षणे ७२
तापातील गंभीर लक्षणे ७२
**९. दैवी चिकित्सा ७४**
**१०. उपसंहार ७६**
तापात अँटिबायोटिक्सचा वापर ७६
ताप आपला शत्रू नसून मित्र आहे ७७

## मनोगत

आयुर्वेदाने तापाला रोगांचा राजा म्हटलेले आहे. आधुनिक वैद्यकशास्त्राप्रमाणे ताप हे अनेक रोगांचे एक लक्षण आहे. तापाची चिकित्सा करतांना जंतू मारण्याची अँटिबायोटिक्स व ताप उतरविण्यासाठी पॅरॅसेटॅमॉल, ॲस्पिरिन यांसारखी औषधे दिली जातात; परंतु ५० टक्के ताप व्हायरस इन्फेक्शनमुळे होत असल्यामुळे व व्हायरस मारणारी अँटिबायोटिक्स उपलब्ध नसल्याने त्यात अँटिबायोटिक्सचा उपयोग होत नाही. शिवाय बरेच जंतू अँटिबायोटिक्सना दाद देत नाहीत. अशा वेळी आधुनिक वैद्यकशास्त्र निष्प्रभ ठरते.

तापाची गणना रोगांत केल्यामुळे आयुर्वेदाने तापाचा सखोल अभ्यास केला आहे. तापाचे जंतू शरीरात शिरल्यापासून तापाची सुरुवात होण्याच्या काळाला 'इन्क्युबेशन पीरिएड' म्हणतात. तापाच्या इन्क्युबेशन पीरिएडमध्ये तापाचे निदान व ताप येऊ नये म्हणून आधुनिक वैद्यकशास्त्रात उपाय नाहीत. आयुर्वेदाप्रमाणे इन्क्युबेशन पीरिएडमध्ये चय, प्रकोप, प्रसर व स्थानसंश्रय या अवस्था सांगितल्या आहेत. चय अवस्थेत ताप येऊ नये म्हणून काय करावे याचा शास्त्रशुद्ध विचार केला आहे. 'चय एव जयेत् दोषान् ।' त्याचप्रमाणे तापाचा प्रकोप, प्रसर व स्नानसंश्रय अवस्थेतही रोग पुढील अवस्थेत जाऊन तापाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून उपाय सांगितले आहेत.

आयुर्वेदाने तापाची कारणे व लक्षणे ध्यानात घेऊन वातप्रधान, पित्तप्रधान व कफप्रधान अशी विभागणी केली आहे. त्यामुळे तापाची चिकित्सा वातशामक, पित्तशामक किंवा कफशामक औषध व आहार-विहार वापरून करता येते.

दोषांनी रक्त, मांस इत्यादि धातू व हृदय, लिव्हर इत्यादि अवयव दूषित झाल्यामुळे येणाऱ्या तापात दोषाप्रमाणेच धातू व अवयव यांना बलदायक आहार व औषधे द्यावी.

तापाच्या सुरुवातीच्या अवस्थेत ताप खाली आणणारी आयुर्वेदिक औषधे किंवा पॅरॅसेटॅमॉल, ॲस्पिरिन यांसारखी औषधे दिल्यास होणाऱ्या दुष्परिणामांचे आयुर्वेदाने वर्णन केले आहे. त्यामुळे तापाची तीव्रता वाढते व ताप जास्त दिवस रहातो. तापाची परिणति धातुगत ज्वरात, विषमज्वरात किंवा जीर्णज्वरात होते.

आयुर्वेदाने तापाच्या आमावस्था, पच्यमानावस्था व पक्वावस्था अशा तीन अवस्थांचे वर्णन करून प्रत्येक अवस्थेत उपयोगी पडणाऱ्या चिकित्सा सूत्रांचे वर्णन केले आहे. उदा. आमावस्थेत व पच्यमानावस्थेत लंघन करावे व वमन विरेचन देऊ नये, असे सांगितले आहे. पक्वावस्थेत शरीरातील दोष पूर्णपणे निघून जाण्यासाठी वमन, विरेचन व बस्ति (एनिमा) द्यावा. म्हणजे ताप पूर्णपणे निघून जातो व त्याचे रूपांतर जीर्णज्वरात होत नाही. तापाच्या वेगवेगळ्या आहार, विहार, औषधे व चिकित्सा कशा कराव्या याचे उत्कृष्ट मार्गदर्शन आयुर्वेदाने केले आहे. आयुर्वेदाने आगन्तु - बाह्य कारणांनी येणाऱ्या तापांचे वर्णन केले आहे. त्यामध्ये बाहेरून येणारे जंतू (भूत), ग्रहबाधा व मानसिक कारणांचे वर्णन केले आहे. त्यांत क्रोध, काम, भीति व शोक यांमुळे येणाऱ्या तापाचे वर्णन केले आहे व त्यांची विशिष्ट चिकित्साही सांगितलेली आहे.

न्युमोनिया, टी.बी. (क्षय), मेनिंजायटिस यांसारख्या गंभीर रोगांत ॲंटिबायोटिक्समुळे रोग्याचे प्राण वाचतात. तापाचे उपचार करतांना वैद्याने रोगाचे जंतू मारणारी ॲंटिबायोटिक औषधे उपलब्ध असल्यास जरूर वापरावीत; परंतु त्याचबरोबर वाढलेले दोष, दूषित झालेले धातू व अवयव, रोग्याचे बल, पचनशक्ति, प्रकृति, वय, मानसिक स्थिति, ऋतु, आहार व रोगाची अवस्था या सर्वांचा विचार करून रोग्यास पथ्य-अपथ्य समजावून देऊन योग्य औषधोपचार करावेत.

अशारीतीने योग्य वेळी योग्य औषधोपचार केल्यास रोग्यास ताप येण्याची शक्यता कमी होईल; ताप आल्यास सौम्य प्रमाणात येईल व कोणतेही उपद्रव न होता रोगी पूर्णपणे बरा होईल.

हे पुस्तक वैद्यकीय विद्यार्थी, वैद्य, डॉक्टर्स, परिचारिका तसेच ताप येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला म्हणजे सर्वांनाच उपयोगी होईल. पुस्तकाचा अभ्यास करून त्याचा उपयोग स्वतःसाठी व दुसऱ्यांसाठी करून आणि आरोग्याचे व धर्माचे नियम पाळून सर्व जणच तापमुक्त होवोत, हीच भगवान शंकराजवळ मनोमन प्रार्थना !